# आम्ही देवाची सेवा कशी करतो

मुलांना एकमेकांची सेवा करायला शिकवा

मुलांना शिकवण्यासाठी यापैकी कोणतीही कृती निवडा

**मत्तय 25:14-30** ह्या शास्त्रगात विश्वासू कारभाऱ्यांचा वृत्तांत दिला आहे. तो मोठया मुलांना किंवा शिक्षकांना वाचव्यास वा कथन करण्यास सांगा.

- देवाने आमच्यापैकी प्रत्येकाला त्याच्यासाठी करावयाचे काम सोपवून दिले आहे असे हा वृत्तांत सांगतो.
- आम्ही त्याचे कारभारी आहोत; आम्हांला त्याने दिलेल्या सर्व गोष्टींनी आम्ही त्याची सेवा केली पाहिजे.
- स्पष्ट करा ''तालांत'' म्हणजे सोण्याचे नाणे.



वृत्तांत सांगून झाल्यावर, पुढील प्रश्न विचारा. (आवश्यकता असल्यास, उत्तरे प्रत्येक प्रश्नाच्या पूढे दिली आहेत.)

- त्या मनुष्याने आपल्या तीन दासांना प्रत्येकी किती पैसे दिले? *(पाहा व 15)*
- प्रत्येक दासाने त्याला मिळालेल्या पैशांचे काय केले? *(पाहा व 16-18)*
- आपल्या दासांनी त्यांना दिलेल्या पैशांचा सूज्ञपणे उपयोग केल्याचे पाहून धनी काय म्हणाला? *(पाहा व 29)*
- आळशी दासाने त्याला मिळालेल्या एका सोन्याच्या नाण्याचे काय केले? *(पाहा व 25)*
- ह्या दासाचे काय झाले? *(पाहा व 30)*

वृत्तांतातील विश्वासू कारभाऱ्यांच्या भागाचे **नाट्यीकरण करा.**

- हे नाट्यकरण सादर करण्यासाठी उपासना चालवणाऱ्या मुख्य पुढाऱ्याशी चर्चा करा.
- नाटकाची तालीम करताना मुलांबरोबर वेळ व्यतीत करा.
- वृत्तांतातील सर्वच भागांचे तुम्ही नाट्यीकरण केलेच पाहिजे असे नाही.
- तयारी करताना मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.
- मुलांना पंधरा मोठी नाणी तयार करायला सांगा यासाठी त्यांना पुठ्ठयाचा वापर करता येईल.

माठी मुलेकिंवा प्रौढांना पुढील भूमिका करू दया:

**निवेदक.** वृत्तांताचा थोडक्यात सारांश सांगून काय बोलायचे ते मुलांना समजावून सांगा.

**घराचा धनी.** हातात प्रवासाची बॅग व हातात आठ नाणी धरा.

लहान मुलांना पुढील भूमिका करायला सांगा.

**विश्वासू दास क्रमांक 1 व 2**

आळशी दास. एक खडक त्याच्याकडे आहे.

व्यापारी विकण्याच्या गोष्टी आणा (पेटया किंवा कागद) तसेच त्यामध्ये मोठी सात नाणीही ठेवा.

**विश्वासू कारभाऱ्यांच्या दाखल्याचे नाट्यीकरण करा.**

**निवेदकः** वृत्तांताचा पहिला भाग, मत्तय 25:14-18 सांगा. मग म्हणा, ''घराचा धनी काय म्हणतो ते ऐका''

**घराचा धनीः** तुमची बैग खांद्याला अडकवा आणि म्हणा, ''दासांनो, मी लांबच्या प्रवासाला जात आहे. जाण्यापूर्वी मी तुम्हांला काही पैसे देणार आहे. ते तुम्ही योग्य ठिकाणी गुंतवा''

पाच नाणी मोजून पहिल्या दासाला द्या.

दोन नाणी मोजून दुसऱ्या दासाला द्या.

एक नाणे मोजून आळशी दासाला द्या.

**विश्वासू दास क्रमांक 1 व 2:** व्यापाऱ्यांकडे जाऊन त्यांच्याकडे आहेत त्या वस्तू पेय्य किंवा जमीन इत्यादी) विकत घेण्याचे नाटक करा. त्यांना तुमच्याकडील नाणी द्या.

**आळशी दासः** इकडे तिकडे पाहून कोणी बघत नाही याची खात्री करून घ्या. मग तुमच्याकडे असणारे नाणे जमीनीत दगडाच्या खाली पुरून ठेवा आणि म्हणा, ''माझे नाणे सुरक्षित राहावे म्हणून मी ते लपवून ठेवीन!''

**निवेदकः** वृत्तांताचा दुसरा भाग, मत्तय 25:19-23 सांगा मग म्हणा, ''घराचा धनी काय म्हणतो ते ऐका''

**घराचा धनीः** ''मी प्रवासाहून परत आलो आहे. दासांनो, चला या, मी तुम्हांला दिलेल्या सोन्याच्या नाण्यांचे तुम्ही काय केले ते कोठे गुंतवले ते मला सांगा''

**विश्वासू दास क्रमांक 1 व 2:** पुन्हा व्यापाऱ्यांकडे जा आणि तुमच्याकडे असेल ते विकून टाका.

**व्यापारीः** दास विकतील त्या वस्तू घ्या. मोठयाने म्हणा, ''यावेळेस बऱ्याच वस्तू विकायला आणल्यात!'' ''तुम्ही बरेच घार्शत दिसता!'' (त्यांना त्यांची नाणी आणि इतरही नाणी परत द्या. ज्या दासाने पाच नाणी दिली त्याला दहा नाणी परत मिळाली तर दोन नाणी देणाऱ्याला चार नाणी मिळाली.)

**विश्वासू दास क्र. 1** धन्याकडे परत येऊन म्हणतो, ''मी अवजारे (किंवा तुम्ही ज्या वस्तुंची खरेदी व विक्री केली असेल) विकत धेऊन तुमचा पैसा दुप्पट केला तुम्ही मला सोन्याची पाच नाणी दिली होती. ही पाहा दहा नाणी.'' तुम्ही कशाची खरेदी व विक्री केली ते त्याला सांगा.

**विश्वासू दास क्र. 2** धन्याला चार नाणी देऊन तुम्ही त्याचे पैसे दुप्पट केल्याचे सांगा. तुम्ही कशाची खरेदी व विक्री केली ते त्याला सांगा.

**धनीः** ''छान चांगले केलेत विश्वासू दासांनो या माझ्या बरोबर राहा. तो दुसरा दास कोठे गेला?''

**निवेदकः** वृत्तांताचा तिसरा भाग (मत्तय 25:24-30) सांगा. मग म्हणा, ''आळशी दास काय म्हणतो ते ऐका''

**आळशी दासः** जाऊन दगडाखाली ठेवलेले एक नाणे धेऊन या आणि ते धन्याला द्या. मग म्हणा, ''मालक, हे घ्या तुमचे पैसे मी त्याचे काहीही केले नाही. ते हरवेल अशी मला भीती वाटली म्हणून मी ते दगडाखाली लपवून ठेवले.''

**धनीः** ''अरे. आळशी दासा! मी दिलेले नाणे तू कोठेच गुतवले नाहीस. माझ्या घरातून चालता हो!''

**निवेदक किंवा मोठा मुलगाः** नाटक संपल्याचे जाहिर करून मदत करणाऱ्यांचे आभार माना.

**प्रश्न विचारा**- मुलांनी ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढांसाठी केले असेल तर वर दिलेले प्रश्नच त्यांना लोकांना विचारायला सांगा.

**चर्चा करा.** ''देवाची सेवा करताना उपयोगी पडतील अशी कोणती दाने व आशीर्वाद तो आम्हांला देतो त्याची उदाहरणे सांगा.'' (प्रौढांना किंवा मुलांना उदाहरणे देऊ द्या.)

सोन्याच्या पाच मोठया नाण्यांचे चित्र काढा आणि मुलांना ते कागदावर काढायला सांगा.

- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.
- त्यांना उपासनेच्या वेळी प्रौढांना किंवा घरी आई वडीलांना काढलेली चित्रे काढण्यास सांगा.
- ह्या नाण्यांवरून आपल्याला दिसते की देव आम्हांला जी दाने व आशीर्वाद देतो त्यांचा उपयोग त्याची सेवा करताना करायचा असतो ती आपल्याकडेच साठवून ठेवायची नसतात, हे मुलांना स्पष्ट करून सांगू द्या.



**पाठ करा मत्तय 6:24**

कविता तीन मुलांना स्तोत्र 65:4, 5 व 9 ही वचने प्रत्येकी एक या प्रमाणे म्हणायला सांगा.

इतरांची सेवा करण्यासाठी देवाच्या दानांचा उपयोग करण्या विषयीच्या कविता गाणी किंवा नाटिका मोठया मुलांना लिहिण्यास सांगा.

**प्रार्थना:** प्रिय प्रभु तू अत्यंत उदार आहेस तू आमच्यावर अनेक दान आणि आशीर्वादाचा वर्षाव केला आहेस ह्या दानांचा उपयोग तुझ्या सेवेसाठी करावा म्हणून तू आमचे साहाय्य कर. तुझ्या नावामध्ये इतरांची सेवा आम्ही विश्वासूपणे करावी यासाठी आम्हांला साहाय्य कर आम्हांला मिळलेली दाने आम्ही तुझ्या करीता उपयोगात आणत नाही तेव्हा आमची क्षमा कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net